महापालिका सहाय्यक आयुक्त
वारजे कर्वेनगर कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. ६०८९
दिनांक ९५/३/२०२१

# आदेश

विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) आजाराच्या अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone) सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र घोषित करणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि. १३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना-२०२०/५८/आरोग्य५ दि. १३/३/२०२०.

माहे फेब्रुवारीच्या प्रथम सप्ताहापासून कोरोनाबाधित (कोविड-१९) रुग्ण वाढीचा दर वाढलेला असून त्यामुळे कोरोना विषाणूची दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीमध्ये वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील खालीलठिकाणी कोरोना विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने रुग्ण आढळून येत आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नाव |
|---|---|---|
| १ | १३ | शिवरंजनी सोसायटी, बी विंग, हॅप्पी कॉलनी, लेन नं. १, कोथरूड, पुणे |
| २ | १३ | गिरीजाशंकर विहार, इ-१ विंग, कर्वेनगर, पुणे |
| ३ | ३२ | स्नेहा पॅराडाईज सोसायटी इ-विंग, वारजे माळवाडी |
| ४ | ४२ | वेस्ट कोस्ट पार्क, ए विंग, शिवणे |

तरी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी उपरोक्त सदरचा परिसर हा सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

वरील परिसर व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

१) इतर नागरिकांनी त्यांच्या आवारात अथवा घरी भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे पल्स ऑक्सिमीटर आणि थर्मल डिटेक्टरच्या साहाय्याने तपासणी सदर सोसायटीने करावी. कोविडसाठी पल्स ऑक्सिमीटर तपासणी ही दिशादर्शक आहे. ज्या व्यक्तीची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ च्या खाली असल्यास त्यास त्वरित पुढील तपासणीकरिता महापालिकेची रुग्णालये अथवा खाजगी डॉक्टर यांचेमार्फत तपासणी करून घेणेबाबतची सुचना देण्यात यावी.

२) याठिकाणी राहणाऱ्या ज्येष्ठ व्यक्ती / १० वर्षाखालील मुले / आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती यांची पल्स ऑक्सिमीटरद्वारे तपासणी करून त्यांची दैनंदिन नोंद ठेवण्यात यावी.

३) ज्या व्यक्तीची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ च्या खाली आल्यास अशा व्यक्तींची डॉक्टरांच्या सल्याने तात्काळ स्वॅब टेस्ट करून घेण्यात यावी. स्वॅब टेस्ट करण्याकरिता वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयामार्फत एस.एन.डी.टी. कॉलेज येथील RTPCR स्वॅब सेंटर व कै. अरविंद बारटक्के हॉस्पिटल येथील Rapid Antigen टेस्ट सेंटर याठिकाणी मोफत सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास आपले परिसरातील वरिष्ठ आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.

४) सदर ठिकाणी कोविड १९ व्यतिरिक्त इतर आजारांकरिता रुग्णालयात दाखल असणाऱ्या रुग्णांबाबतची माहिती कृपया warjekarvenagar@punecorporation.org या ई-मेल वर उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून केवळ कोविड १९ चे अनुषंगाने माहितीचे विश्लेषण करून वैद्यकीय विभागामार्फत पुढील मदत उपलब्ध करून देता येईल.

५) सोसायटीचे आवारात सोशल डिस्टन्सिंगचे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्कचा वापर करेल याबाबतची दक्षता घ्यावी.

६) वरील सुचनांची पालन करून आपण आपली, आपल्या कुटुंबाची तसेच आपल्या परिसराचा कोविड १९ पासून बचाव करू शकता.

पुणे शहर कोरोना विषाणूमुक्त करणेकरिता आत्तापर्यंत आपण दिलेल्या सहकार्याबद्दल वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचे वतीने मी आपला ऋणी असून अद्यापही कोरोनाचे संकट पूर्णतः न टळल्याने आपण सहकार्य करावे ही विनंती.

15/3/21

(संतोष वारुळे)
महापालिका सहाय्यक आयुक्त
वारजे कर्वेनगर कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत –

१) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि), पुणे महानगरपालिका
२) मा. आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका
३) मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३, पुणे महानगरपालिका
४) मा. समन्वयक, डीपीसी सेल, पुणे महानगरपालिका
५) मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, अलंकार पोलीस स्टेशन, पुणे
६) मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे
७) मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, उत्तमनगर पोलीस स्टेशन, पुणे